**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक – २८/०८/२०२४

## दि. २७/०८/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ७४९ /२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०९(१),११५(२),३५१ (२),३(५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५, भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४ सह २५, क्रिमिनल लॉ अमेटमेंन्ट कलम ३ सह ७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २४/०८/२०२४ रोजी रात्री ०८.४० वा.च्या सुमारास डी. वाय. पाटिल हॉस्पीटल, पिंपरी येथे पहिला मजला |
| गुन्हा दाखल | :- | दि २७/०८/२०२४ रोजी ०२/०८ वा. |
| फिर्यादी | :- | रोहित हिंदुराव रकटे, वय.२८ वर्षे, धंदा.नोकरी, रा. सोपान कुटे चाळ,रुपेश कॉलणी, दत्तवाडी, आकुर्डी, पुणे |
| आरोपी | :- | १)रोहित ओव्हाळ व २) आदित्य यादव दोघे रा. आकुर्डी पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे आजोबा यांच्यासाठी जेवणाचा डब्बा घेवुन डी. वाय. पाटिल हॉस्पीटल,पिंपरी येथे पहिला मजला वरुन जिन्याने दुस-या मजल्यावर जात असताना जेवनाच्या डब्याचा धक्का फिर्यादी राहत असलेल्या परिसरातील मुलगा आरोपी क्र १ यांस लागला असता त्याने व त्याचे सोबत असलेला मुलगा आरोपी क्र २ याने फिर्यादीला शिवीगाळ करुन चापट मारली. त्यावेळी रोहीत ओव्हाळ बोलला कि, तु मला ओळखत नाही का, तु आम्हाला जाणुन बुजुन धक्का दिला आहेस, आम्ही आकुर्डीचे भाई आहोत, तुला आमची भिती नाही का, तुला आज जिवंत सोडत नाही असे म्हणुन त्याने त्याच्या पॅन्टमध्ये लपवलेला लांब चाकु काढुन फिर्यादीचे गळयावर मारला असता फिर्यादीने तो चुकवला तेंव्हा लगेच आदित्य यादव याने नाकावर जोरात त्याच्या हातातील कोणत्यातरी वस्तुने बुक्का मारुन नाकाचे हाड फ्रॅक्चर केले तसेच रोहित ओव्हाळ याने फिर्यादीचे केसांना पकडुन गालावर जोरात त्याचा पायाचा गुडघा मारुन गालाचे हाड फ्रॅक्चर करुन छातीत गुडघा मारला त्यानंतर रोहीत ओव्हाळ याने त्याच्या हातातील चाकु हवेत फिरवुन तेथे जमा झालेल्या लोकांकडे बघुन म्हणाला कि, आम्ही भाई आहोत आमच्याशी जो नडेल त्याची अशी अवस्था करु असे बोलला असता तेथे जमलेले लोक तेथुन सैरावैरा पळु लागले तेंव्हा आदित्य यादव याने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवुन तेथुन निघुन गेले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि आव्हाड ९४०३४६३३१६ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ७५१/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम १०९,३२४ (४)(५), ३५२, ३५१(२)(३), ३(५)क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट ॲक्ट कलम ३,७ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) (२७) महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७ (१) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २६/०८/२०२४ रोजी ११/३० वा चे सुमारास भाटनगर पिंपरी |
| गुन्हा दाखल | :- | दि २७/०८/२०२४ रोजी १९.२१ वा |
| फिर्यादी | :- | सिता माणीक वाघमारे वय-६० वर्ष, धंदा-टपरी व्यवसाय, रा लिंक रोड भाटनगर पिंपरी पुणे |
| आरोपी | :- | १) मॅड गण्या कांबळे वय २२ वर्षे अंदाजे पुर्ण नाव माहीत नाही रा. निराधार नगर पिंपरी पुणे २)तोफ्या शेख वय २२ वर्षे अंदाजे रा. पत्ता माहीत नाही **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांची टपरी बंद करत असताना फिर्यादी यांनी यातील आरोपी क्र १ याने याचेकडे त्याने घेतलेल्या साहीत्याचे पैसे मागीतल्याचा राग मनात धरून त्याचा मित्र तोफ्या यांनी संगनमत करून आरोपी क्र १ याने त्याच्या हातातील तलवारीने फिर्यादी यांना ठार मारण्याच्या उद्देशाने डोक्यात मारून आरोपी क्र २ याने पाठीत दगड मारून जखमी केले व फिर्यादीचे टपरीची तोडफोड करून धमकी दिली |

| | | |
|---|---|---|
| | | आहे.तसेच फिर्यादी यांचे मदतीसाठी येणा-या लोकांना तलवार दाखवून म्हातारीचे मदतीला कोणी आले तर त्यांचा खेळ खल्लास समजा अशी धमकी दिली म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि कापरे ९८६०९४९८२५ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ५६९/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९(६),३(५) भारतीय शस्त्र अधिनिय ४(२५), क्रिमीनल अमेन्टमेंट ॲक्ट ७, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१),१३५. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २४/०८/२०२४ रोजी १७.४५ वा चे सुमारास मौजे निघोजे ता खेड जि पुणे गाव चे हद्दित अल्ट्राकंपनीचे समोरील रोडवर |
| गुन्हा दाखल | :- | दि २७/०८/२०२४ रोजी ०३.३१ वा |
| फिर्यादी | :- | लक्ष्मणदास नागोदास, वय २१ वर्षे, धंदा मजुरी, रा. निर्मल बिल्डटेकइंडीया प्रा.लि. कंपनी यांचे लेबरकॅम मध्येनिघोजे, ताखेड, जि पुणे मुळ गाव गावतालझरनी, पोलीसथाना हॅसडीहा, जि. दुमका राज्य झारखंड |
| आरोपी | :- | १) संघपाल दिलीप रोडे वय ३४ रा मंत्रा सोसायटी निघोजे ता खेड जि पुणे<br>२) श्रीराम विकास हनवटे वय ३६ वर्षे रा निगडी पुणे मुळ रा पांगरी ता परळी जि बिड<br>**आरोपी क्र १ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांचा मित्र मुन्नादास असे आम्ही दोघे गावी पैसे पाठविण्यासाठी जात असताना एक लाल रंगाची स्कुटर वरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी गाडी थांबवुन फिर्यादीस हाताने चापट मारुन फिर्यादीचे खिशातील ४०,०००/- रुपये तसेच मित्र मुन्नादास यांचे खिशातील १०,०००/- रुपये असे एकुण ५०,०००/- रु बळजबरीने काढुन घेतले तसेच त्यातील एकाने त्याचे पॅन्टचे आत मध्ये ठेवलेला कोयता बाहेर काढुन हवेत भिरकावुन फिर्यादी व लोंकाना दाखवुन पुढे याल तर खल्लास करु असे धमकावु लागले त्यामुळे तेथील लोक सदर दहशतीमुळे पळुन गेले तसेच त्यांना घाबरुन फिर्यादी तेथुन पळुन जात असताना फिर्यादीने त्यांचे लाल रंगाचे स्कुटर गाडीचा नंबर पाहीला असता तीचा नंबर एम.एच.१४ जे.टि.१४१२ असा होता. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि घाडगे ८६५२५२३९७२ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ४८९/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३)३०५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २६/०८/२०२४ रोजी सकाळी १०/०० वा सुमारास ते सायंकाळी १८/३० वा दरम्यान से.नं.१६,प्लॉट नंम.२४ प्लॅट नं.८ जिवन आंनद सोसायटी ,राजे शिवाजीनगर चिखली पुणे येथील तक्रारदार यांचे राहते घरातुन |
| गुन्हा दाखल | :- | दि २७/०८/२०२४ रोजी १५/५४ वा |
| फिर्यादी | :- | सयाजी शहाजीराव माने वय-५० वर्षे, धंदा-व्यवसाय रा.से.नं.१६,प्लॉट नंम.२४ प्लॅट नं.८.जिवन आंनद सोसायटी ,राजे शिवाजीनगर, चिखली,पुणे. |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे राहते घराचे दरवाज्याचे कशाच्यातरी साह्याने लॉक तोडुन घरात प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटातील ९० ग्रॅम वजनाचे २,२५,०००/- रु किंमतीचे सोन्याचे दागिने व १६,०००/- रु रोख रक्कम असे एकुण २,४१,०००/- रु चा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने स्वताच्या अर्थिक फायद्याकरीता चोरुन नेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि पंचमुख ८००७७९४९१९ |

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ७५३/२०२४ भादवि कलम ४०६, ४२० महीती तंत्रज्ञान अधीनियम- २००८ चे कलम - ६६ (सी ) ६ (डी) प्रमाणे प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १७/०६/२०२४ रोजी पासुन ते ०७/०८/२०२४ पर्यतगंगा वल्लभ नगर पिंपरी पुणे ४११०१८

गुन्हा दाखल :- दि २७/०८/२०२४ रोजी २२/३२ वा.

फिर्यादी :- महीला फिर्यादी वय-४७ वर्षे,धंदा- गृहीणी रा. वल्लभ नगर पिंपरी पुणे

आरोपी :- १) लिडीया मोबाईल नंबर- ७३८८३६९९९३ व २) राहूल कपूर मो.नं- ८९५९५११७९४/८८९७१३७८२५ या इसमाविरुद्ध व खाते धारक २) ऋत्विक एन्टरप्राईजेस यांचे एस.बी.आय बॅक अकाउंट नंबर ००००००४३०४६६०६०९८ ३) सेल्वी एन्टप्राइजेस यांचे एस.बी.आय बॅक अकाउंट नंबर ००००००४३०२५४५७४२६ ४) बंगाल प्लॅस्टीक यांचे बंधन बॅक अकाउंट नंबर २०१०००२६१६६००८ ५) यु.सी.ओ. बॅक अकाउंट नंबर २०९६०२१०००६४८१ ६) वैष्णवी कॉमन सर्व्हीस सेंटर हीचे आयओबी बॅक अकाउंट नंबर २१६७०२००००००४१४ ७) मधुसुदन क्रेन वर्क यांचे आय.डी.एफ.सी बॅक अकाउंट नंबर ८११११२२२५५५१ ८) कॉमन सर्व्हीस सेंटर हीचे आयओबी बॅक अकाउंट नंबर २१६७०२००००००४१४ ९) बिस्मीला मटण शॉप बंधन बॅक अकाउंट नंबर २०१०००२९९६८५३१ १०) आरमार प्रायव्हेट लि. सी.आय.सी.आय बॅक अकाउंट नंबर ७४२४०५००००३७ ११) तौफीक यांचे जन बॅक अकाउंट नंबर ३२५५०२०००११२१६४३

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना गुगलवर जाहीरातीवरील लिंक ओपन करून नमुद व्हॉट्सअप मोबाईल क्रमांक मो. नं ७७२२०१३५६९ धारक यांनी फिर्यादी यांच्या मोबाईलवर मॅसेजव्दारे संपर्क करुन शेअर मार्केट मध्ये शेअर्स खरेदी विक्री करुण नफा देतो असे सांगुन आरोपी यांनी वेगवेगळे बॅक खाते क्रमांक वरुण शेअर्स खेरदीच्या नावाने शेअर्स मध्ये पैसे गुंतविण्यास सांगुन त्यांचा विश्वास संपादन करुन व त्यांची स्वतःची ओळख लपवुन फिर्यादी यांची रुपये ९४,२७,०००/-रक्कमेची अर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि आव्हाड ९४०३४६३३१६

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी ९७१/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१९(२), ३१८(४),३१६(२), माहिती तत्रज्ञान कायदा कलम ६६,(सी),(डी)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २३/०७/२०२४ रोजी दुपारी ०२.०० वा चे सुमारास राहते घरी बावधान बुर्दुक पुणे २१ येथे

गुन्हा दाखल :- दि २७/०८/२०२४ रोजी २०.४० वा

फिर्यादी :- पुरुष फिर्यादी वय-८२ वर्षे ,धंदा-सेवा निवृत, रा बावधान बु. पुणे

आरोपी :- अनोळखी इसम मो.न. ९०३८४२१७३१

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी याने फिर्यादी यांचे मोबाईल नंबरवर फोन करुन तुमचे एम. एन.जी.एल चे बिल पेंडीग आहे.असे सांगुन httpùs..https..//play.google.com/store/app/details?id=com.teamviewer.quicksupport.mrket लिंक पाठवुन ती लिंक ओपन करण्यास सांगुन फिर्यादी यांचे मोबाईलचा ऑपरेटिंग ॲक्सेस स्वतःकडे घेवुन फिर्यादीचे खातेवरुन एकुन २२,२७९,९६/-इतकी रक्कम ट्रान्सफर करुन घेतले व फिर्यार्दी यांचे फिक्स डीपॉझिट खाते मधील रक्कम तारण ठेवुन त्याबदल्यात एकुण १७,०४,५००/-रकमेचे लोन घेतले.त्यांनतर फिर्यादी यांनी सदर बाबत बॅकेस कळवुन सदर डिपॉझिट खाते बंद केले परंतु बॅकेने फिर्यादी यांचे फिक्स डीपॉझिट मधील व्याजासह रुपये १७,६०,०००/-रक्कम कट करुन घेवुन उर्वरित रक्कम परत दिली.तरी सदर अनोळखी इसमाने तोतयेगिरी करुन फिर्यादी यांची एकुण ३९,८७,९९०/-रक्कमेची ऑनलाईन आर्थिक फसवणुक करुन अपहार केला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि पांचाळ ८९२८३७६१००

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | **सांगवी** ३४६/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२), ३१८(४) ६, माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (डी) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०९/०८/२०२४ ते दि.१०/०८/२०२४ रोजी फिर्यादी याचे राहते घरी ऑनलाईन पध्दतीने |
| गुन्हा दाखल | :- | दि २७/०८/२०२४ रोजी १८/०७ वा. |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी धंदा नोकरी, रा काटे वस्ती, पिंपळे सौदागर, पुणे |
| आरोपी | :- | ९२८९००४०६५ मो.नं.धारक रघुवीर सिंघ , ९२९२९०८७७४,९२८७२७७१६७ मो.नं.धारक, skype ID -०३८२ MUMBAI CYBER CRIME , skype ID -7193 MUMBAI CYBER CRIME, skype ID– 1199 MUMBAI CYBER CRIME व बँक अकाउंट नं.७७१८०५००००४, ४२९४०७१७५२७, ४५८८९२८७१३८९, १४८१०५५००१६२, ४३१७५६४३७९३ अकाउंट धारक |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना रघुवीर सिंघ (फेडेक्स कुरियर कंपनी) याने मो.नं. ९२८९००४०६५ वरुन कॉल करुन फिर्यादीचे नावे पार्सल आले असुन त्यामध्ये ड्रग्ज असल्याचे सांगुन पोलीस क्लियरंन्स सर्टिफिकेट लागत असल्याचे सांगुन skype app वरुन फिर्यादीकडे चौकशी करायची असे सांगुन फिर्यादीकडुन skype app वरुन आय.सी.आय.सी बॅकेचे नेट बॅकिंग व गुगल पे ओपन करण्यास सांगुन, फिर्यादीचे बॅक अकाऊंट मध्ये आय.सी.आय.सी.आय बॅकेकडुन ऑनलाईन २०,००,०००/-रुपये रक्कमेचे लोन घेवुन ते लगेच वरिल आरोपी याचे बँक अकाउंटमध्ये २६,४८,१९८ /- रुपये ट्रान्सफर करुन फिर्यादीची ऑनलाईन २६,४८,१९८ /- रुपयांची आर्थिक फसवणुक केली. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | वपोनि बनसोडे ७८७५०७०२३५ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ३७७/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम २८१, १०६ (२) व मो.वा.का १८४, ११९/१७७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १६/०८/२०२४ रोजी सकाळी ०७/०० वा.चे सुमारास थरमॅक्स चौकाजवळ, निगडी,पुणे. येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि २७/०८/२०२४ रोजी १५/०१ वाजता |
| फिर्यादी | :- | गोविंद माधवराव कल्याणकर वय ५३ वर्ष,धंदा सिक्युरीटी गार्ड, सध्या रा. हिंगणेमळा, हडपसर,पुणे. मुळ रा. मु.पो. पिंपळगाव महादेव, ता.आर्धापुर, जि. नांदेड |
| आरोपी | :- | रिक्षा नं. एम एच १४ सी यु ३२२३ ही वरील चालक |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची पत्नी सौ.पार्वती गोविंद कल्याणकर वय ५० वर्षे, सध्या रा. हिंगणेमळा, हडपसर, पुणे. मुळ रा. मु.पो. पिंपळगाव महादेव, ता. आर्धापुर, जि.नांदेड. ही सकाळी ०७/०० वा.चे सुमारास रिक्षा नं एम एच १४ सी यु ३२२३ हीमधुन सौ.रोहिणी मुंकूद देवकाते व सौ. साखरे यांचे सोबत खंडोबामाळ चौक ते थरमॅक्स चौक असा प्रवास करत असताना थरमॅक्स चौकाचे जवळ आले असताना यातील रिक्षा नं एम एच १४ सी यु ३२२३ हीचेवरील चालकाने त्याचे ताब्यातील रिक्षा ही भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणाने, वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन जोरात चालवुन रोडवरील खड्डयात आपटुन रिक्षात बसलेली फिर्यादीची पत्नी ही रिक्षातुन रोडवर पडल्याने फिर्यादीचे पत्नीचे डोक्याला गंभीर जखमी करुन मृत्युस कारणीभुत झाला आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि कदम ९५९४९०५०१३ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ४१८/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम २८१, १२५(ए)१२५ (बी),सह.मो.वा.कलम ११९/१७७, १८४,१३२(१)(क) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २४/०८/२०२४ रोजी सकाळी १०/३० वा चे सुमारास पुणे नाशिक रोडवर काजळे पेट्रोल पंपा जवळ, मोशी, पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि २६/०८/२०२४ रोजी ११/४७ वा |
| फिर्यादी | :- | अकबर हुसेन शेख,वय ४५ वर्षे,धंदा-नोकरी,रा. रामनगरी हौ.सो. ए विंग फ्लॅट नं.९,भोसरी आळंदी रोड,गव्हाणे पेट्रोल पंपा जवळ,भोसरी पुणे, मुळ रा. तिन्हेवाडी रोड,जय महाराष्ट्र हॉटेल शेजारी, राजगुरुनगर, ता.खेड,जि.पुणे |
| आरोपी | :- | डंपर क्र.एम.एच.१४ एल.बी.४३४७ वरील अज्ञात चालक |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची पत्नी शाहिन वय-४१ वर्षे व मोठा मुलगा आतिक वय-२१ वर्षे असे अॅक्टीव्हा दुचाकी क्र.एम.एच.१४ जे.जी. २५३२ हिचेवरुन जय गणेश साम्राज्य चौकाकडुन व काजळे पेट्रोलपंप मोशी कडे जात असताना, काजळे पेट्रोलपंप मोशी येथे भोसरीकडे जाण्यासाठी यु टर्न करण्या करीता डिवाडरच्या साईडने जात असताना, डंपर क्र.एम.एच.१४ एल.बी.४३४७ वरील चालकाने त्याच्या ताब्यातील डंपर हयगयीने,बेदरकारपणे व वाहतुकीच्या नियमांडे दुर्लक्ष करुन चालवुन,त्यांच्या गाडीला पाठीमागुन धडक देवुन,फिर्यादी यांची पत्नी शाहिन वय-४१ वर्षे व मोठा मुलगा आतिक वय-२१ वर्षे यांना गंभीर जखमी करण्यास कारणीभुत झाला तसेच अपघात ठिकाणी न थांबता सदर ठिकाणावरून गाडीसह पळून गेला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा माने ७७०९५३६०७९ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ४२०/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३२४(२) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २७/०८/२०२४ रोजी सकाळी ११/५० वाजता ते दुपारी १२/०५ वाजताचे दरम्यान इंद्रयणीनगर स्कीम नं-१ सेक्टर नंबर ०२ बिल्डींग नं.०३ फ्लॅट नं ०४ मिनीमार्केट जवळ हणुमान मंदीर भोसरी पुणे.येथिल राहाते बिल्डींगच्या समोर रस्त्याच्या कडेला |
| गुन्हा दाखल | :- | दि २७/०८/२०२४ रोजी २३.०८ वा |
| फिर्यादी | :- | गंगाराम बाळासाहेब साठे वयः-३९ वर्षे धंदाः-व्यवसाय राः-इंद्रयणीनगर स्कीम नं-१ सेक्टर नंबर ०२ बिल्डींग नं.०३ फ्लॅट नं ०४ मिनीमार्केट जवळ हणुमान मंदीर भोसरी |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी राहाते बिल्डींगच्या समोरील रस्त्याच्या कडेला चार चाकी गाडीमध्ये १,८०,०००/--रुपये ठेवले असता ते कोणीतरी अज्ञात चोरटयाने कशाच्या तरी साहयाने गाडीची पुढील डाव्या बाजुची काच फोडुन लबाडीच्या इराद्याने स्वतःच्या फायद्यासाठी चोरून नेली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा असवले ७३८७५७६५१४ |

११.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ९३६/२०२४ भारताचा शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ महाराष्ट्र पोलीस अधि ३७(१)(३) सह १३५, १४२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २७/०८/२०२४ रोजी ००.०५ वा.चे सुमारास मोकळे मैदान, सुलभ कॉलनी, गजानन नगर, राहटणी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २७/०८/२०२४ रोजी ०३.०५ वा |
| फिर्यादी | :- | प्रमोद दत्तात्रय कदम पोलीस हवालदार ब.नं. ११९८, नेमणुक वाकड पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | गोरख प्रभु सातपुते वय २९ वर्ष, धंदा-नाही, रा. ठी फिनीक्स हॉस्पीटलच्या बाजुला पवारनगर, थेरगाव वाकड पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने स्वताचे कब्जात बेकायदेशी बिगर परवाना ०१ गावठी बनावटीचे पिस्तुल व ०१ जिवंत काडतुससह अग्निशस्त्र त्यावर केंद्र शासनामे ठरविल्याप्रमाणे बनविणाराचे नाव निर्माणकाचा |

क्रमांक व अन्य ओळखचिन्हे नसलेले आपले कब्जात बाळगले असताना मिळुन आला.तसेच पिंपरी चिंचवड पोलीस नोटीस दिनांक-१९/०८/२०२४ रोजी भाग -१ पान नं-२०१३ मधील मा.पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड यांचे आदेशान्वये पोलीस आयुक्तलयामध्ये दिनांक- २०/०८/२०२४ रोजी ००.०१ वा.पासुन ते दिनांक- ०२/०९/२०२४ रोजी २४.०० वा.पर्यंत दगड अथवा शस्त्रे अस्त्रे सोटे तलवारी भाले लाठी बंदुका किंवा शारीरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु बरोबर नेणे अथवा बाळगणे बाबत मनाई आदेश असताना सदर आदेशाचा भंग केला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि चव्हाण ९५४५४८६०२८

१२.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ३४७/२०२४, भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) सह १३५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २७/०८/२०२४ रोजी १६/४५ वा चे सुमारास औंध जिल्हा आयुष रुग्णालयाचे समोर असलेले पाण्याचे टाकीजवळ, जुनी सांगवी पुणे

गुन्हा दाखल :- दि २७/०८/२०२४ रोजी २०/१४ वा.

फिर्यादी :- सुहास बबन डंगारे, वय ३० वर्षे, पो.कॉ.ब.नं. २२०९, नेमणुक सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्तालय, पुणे.

आरोपी :- ओंकार किसन शिंगोरे, वय २४ वर्षे, रा. गांगार्डे नगर, लेन नं. २, काटेपुरम चौक, पिंपळे गुरव पुणे.
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी याने मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात दि. २०/०८/२०२४ रोजी रात्रौ ००/०१ ते दि. ०२/०९/२०२४ रोजी २४/०० वा पर्यंत घातक हत्यार बाळगण्यास मनाई असताना त्याने त्याचे कब्जामधे २५,०००/- रु किंमतीचे ०१ मॅगझीन नसलेले देशी बनावटीचे पिस्टल व एक ५००/- रु किंमतीचे जिवंत काडतुस विनापरवाना बेकायदेशीर रित्या अनाधिकाराने जवळ बाळगुन असताना मिळुन आला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि ताकभाते ९२८४६४९१७८

१३.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ७५०/२०२४ भा.दं.वि. कलम ४२० माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (डी)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १४/०६/२०२४ रोजी ०२.०० ते ०२.३० वा चे दरम्यान यशर्वत नगर पिंपरी पुणे

गुन्हा दाखल :- दि २७/०५/२०२४ रोजी १६/३० वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय २८ वर्षे, धंदा- गृहीणी, रा. यशवंतनगर पिंपरी पुणे

आरोपी :- मो.नं ९०४५१७०६४३ धारक सपना नावाच्या अनोळखी महिला

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी नामे सपना नावाच्या अनोळखी महिलेने ती एक्सिस बँकेतुन बोलत असल्याचे सांगुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन क्रेडीट कार्डचे महिन्याचे लिमिट वाढविणे आहे असे सांगुन फिर्यादी यांना क्रेडीट कार्डचा नंबर व ओटीपी विचारुन त्याची ३८,७२१/- रुपयांची अर्थिक फसवणुक केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि पाटील ८३२९४३४६१८